**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**
**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

# FIRST INFORMATION REPORT

**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** जालना **P.S.(ठाणे):** कदीम -जालना
   **FIR No.**(प्रथम खबर क्र.): 0123 **Year (वर्ष):** 2024
   **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**02/04/2024 21:22

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 12 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
   1. **Day**(दिवस): मंगलवार **Date From (दिनांक पासून):** 02/04/2024
      **Time Period** पहर 5 **Date To ( दिनांक पर्यंत):** 02/04/2024
      (कालावधी): **Time From (वेळेपासून):** 13:03 बजे
      **Time To (वेळेपर्यंत):** 13:03 बजे

   (b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
   **Date** (दिनांक ): 02/04/2024 **Time (वेळ):** 20:30 बजे

   (c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
   **Entry No. (नोंद क्र.):** 039
   **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 02/04/2024 20:50 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
   1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
   पूर्व, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**
   (b) **Address (पत्ता):** समाज कल्याण कार्यालय , जालना च्या आवारात

   (c) **In case, outside the limit of this Police Station, then**
   **(या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
   **Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
   **District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

**(a) Name (नाव):** दिनेश मुकुंदराव मेव्हणकर

**(b) Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

**(c) Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1990

**(d) Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

**(e) UID No. (यु.आय.डी. क्र.):**

**(f) Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

**(g) ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

**(h) Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | कोष्टी गल्ली, गविनाथ मंदीर, , दगविस, काद्राबाद, जालना,कदीम -जालना, जालना,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | कोष्टी गल्ली, गविनाथ मंदीर, , दगविस, काद्राबाद, जालना,कदीम -जालना, जालना,महाराष्ट्र,भारत |

**(i) Occupation (व्यवसाय):**

**(j) Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):**

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | सुनिल लक्ष्मण काची | | | 1. घर क्रA/16 सुवर्णपार्क, पिंपळ, गुरव, पिंपरी-चिंचवड, पुणे,, कदीम -जालना,जालना,महाराष्ट्र, भारत |
| 2 | छाया अशोक वाकोडे | | | 1. आदर्श शाहु नगर, अंबड रोड जालना,कदीम -जालना,जालना, महाराष्ट्र,भारत |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 3 | आशिष उत्तम जाधव | | | 1. म्हाडा कलनी, पाचंबा देवी, , नुतन वसाहत जालना ,कदीम - जालना,जालना,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| **S.No.** (अ.क्र.) | **Property Category** (मालमत्ता वर्ग) | **Property Type** (मालमत्ता प्रकार) | **Description** (वर्णन) | **Value(In Rs/-)** (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 1500/ रुपये लाचेची रक्कम न्थ्रासिन पावडर लागलेली | 1,500.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

1,500.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| **S.No.** (अ.क्र.) | **UIDB Number** (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिर्याद दिनांक 02.04.2024.

मी दिनेश मुकुंदराव मेव्हणकर वय 34 वर्ष व्यवसाय ऑटो रिक्षा चालक रा.कोष्टी गल्ली, गविनाथ मंदीर, दर्गाविस, काद्राबाद, जालना मोबाईल क्रमांक 7038440723

समक्ष ॲन्टी करप्शन ब्युरो जालना येथे हजर येवून फिर्याद देतो की, मी वरील ठिकाणचा राहणारा असुन मला तीन मुली असुन मी पत्नीसह मजुरी करुन कुटुंबाचा उदरनिर्वाह करतो.

मी सिंधुकृपा फुडस या नावाने मसाला उद्योग व्यवसाय करण्यासाठी शासनाच्या राष्ट्रीय अनुसुचित जाती वित्त व विकास निगम योजना (NSKFDC) अंतर्गत कर्ज घेण्यासाठी दिनांक 28.01.2023 रोजी महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळला ऑनलाईन अर्ज भरलेला होता.माहे फेब्रुवारी 2024 मध्ये महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ जालना येथील जिल्हा व्यवस्थापक साहेब व वाघ मॅडम हे स्थळपाहणी करण्यासाठी माझ्या राहत्या घरी आले होते. त्यावेळी त्यांनी माझे व माझ्या घराचे गुगल मॅप फोटो काढुन घेतले होते.

मी दिनांक 21.03.2024 रोजी महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ जालना येथे जाऊन वाकोडे मॅडम यांना भेटलो. त्यावेळी त्यांनी मला कर्जाचे जामीनदारांचे 100/-रुपयाच्या बॉण्ड वर शपथपत्र आणायचे सांगितले. तसेच वाकोडे मॅडम यांनी तुझी फाईल पुर्ण करुन प्रादेशिक कार्यालय छत्रपती संभाजीनगर येथे मंजुरी सादर करण्यासाठी मला 3000/-रुपये दयावे लागेल असे म्हणाल्या. तेंव्हा मी त्यांना म्हणालो की, मी पैसे सोबत आणलेले नाही असे म्हणालो असता वाकोडे मॅडम यांनी मला सांगितले की, तु ज्या दिवशी शपथपत्र आणुन देशील त्यादिवशी 3000/-रुपये आणुन दे असे सांगितल्याने मी तेथुन घरी निघुन गेलो.

महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ जालना येथील वाकोडे मॅडम यांनी मागीतलेले पैसे हे लाचेचे आहे हे मला माहिती असल्याने मी आज रोजी ॲन्टी करप्शन ब्युरो जालना येथे तक्रार देण्यासाठी हजर आलो आहे. मला महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ जालना येथील वाकोडे मॅडम यांना पैसे देण्याची इच्छा नाही. त्यांची व माझी वैयक्तिक दुश्मनी नाही किंवा त्यांचा माझा देण्या घेण्याचा कोणताही आर्थिक व्यवहार नाही. मी जर त्यांना पैसे दिले नाही तर ते माझे काम करणार नाही.

मी आज दिनांक 28.03.2024 रोजी महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ जालना येथे जावून वाकोडे मॅडम यांची भेट घेऊन त्यांचे सोबत माझ्या कामाविषयी बोलणार आहे. त्यावेळी त्यांनी मला लाचेची मागणी करुन स्वत: किंवा इतरां मार्फत स्विकारल्यास कायदेशीर कारवाई करावी ही विनंती अशा मजकुराची तक्रार दिली होती. माझ्या दिलेल्या तक्रारी वरुन ॲन्टी करप्शन ब्युरो जालना येथील पोलीस उप अधीक्षक श्री.किरण बिडवे साहेब यांनी दोन शासकिय पंचाना बोलावुन माझी व पंचाची ओळख करुन देवुन माझी तक्रार त्यांना दाखविली. मी दिलेल्या

टंकलिखीत तक्रारीवर मी, पंचानी व श्री.बिडवे साहेब यांनी सह्या केल्या.

मी महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ जालना येथील वाकोडे मॅडम यांचे विरुध्द दिलेली तक्रार खरी आहे काय ? त्या माझ्या कडे लाच मागतात काय ? याची खात्री करण्यासाठी दिनांक 28.03.2024 रोजी लाचमागणी पडताळणी करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यावेळी अॅन्टी करप्शन ब्युरो जालना कार्यालयात श्री.बिडवे साहेबांनी मला, पंचाना व सापळा पथकास सूचना देवुन पोलीस अंमलदार श्री.घायवट यांनी व्हाईस रेकॉर्डर मशीन मध्ये एक नविन मेमरी कार्ड टाकुन त्यामध्ये पूर्वीचे कोणतेही संभाषण नसल्याची खात्री करुन दिली. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर मशीन सुरु करुन त्यामध्ये माझे, दोन्ही पंचाचे व श्री.बिडवे साहेब यांचे वक्तव्य घेऊन एका कापडी पिशवीत टाकुन माझ्या शर्टाच्या आतुन गळयात व्हाईस रेकॉर्डर मशीन अडकवण्यात आली. त्यानंतर मला पंच क्र.1 विधाटे यांचे सोबत वाकोडे मॅडम यांना भेटण्यासाठी महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ जालना येथे पाठविण्यात आले. मी व पंच क्र.1 विधाटे असे आम्ही माझ्या ऑटो रिक्षाने रवाना होऊन समाज कल्याण कार्यालयाच्या बाहेर रोडवर ऑटो रिक्षा उभा करुन पायी चालत महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ जालना कार्यालयात गेलो. कार्यालयात थोडा वेळ थांबुन वाकोडे मॅडम यांच्या जवळील गर्दी कमी झाल्यानंतर त्यांची भेट घेतली. त्यावेळी माझी व वाकोडे मॅडम यांचेत आपसात कामासंबंधी चर्चा झाली. त्यावेळी वाकोडे मॅडम यांनी पंच क्र.1 विधाटे यांचे समक्ष मी तर बोललीच त्यादिवशी, ती तर बोललीच ना त्यादिवशी असे म्हणाल्या असता मी आणखीन कमी करावं म्हणुन इथं आलो मॅडम असे म्हणालो. त्यावर वाकोडे मॅडम यांनी कमी नाही होत असे सांगितले. त्यावर मी वाकोडे मॅडम यांना म्हणालो की, दीडइक हजार रुपये त्यावर वाकोडे मॅडम जशी तुझी ईच्छा असे म्हणाल्या. त्यानंतर मी वाकोडे मॅडम यांना म्हणालो की, बस दीड हजार पर्यत त्यावर वाकोडे मॅडम हंम्म असे म्हणुन संमती दिली. तसेच मी वाकोडे मॅडम यांना म्हणालो की, दीड हजार कमी कराना असे म्हणालो असता वाकोडे मॅडम करुन टाक, सरांना सराचं करताय ना असे म्हणाल्या. त्यानंतर माझी व वाकोडे मॅडम यांचेत आपसात कामासंबंधी बरीच चर्चा झाली. त्यानंतर वाकोडे मॅडम यांनी मला सोमवारी जिल्हा व्यवस्थापक साहेबांना भेटण्यास सांगितल्याने मी व पंच क्र.1 विधाटे असे आम्ही अॅन्टी करप्शन ब्युरो जालना येथे परत आलो. तेव्हा माझे जवळील व्हाईस रेकॉर्डर श्री.बिडवे साहेबांच्या सांगणे वरुन पोलीस अंमलदार श्री.घायवट यांनी बंद केला. व्हाईस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्ड झालेले संभाषण श्री.बिडवे साहेबांनी माझ्या व पंचा समक्ष ऐकले. त्यामध्ये वाकोडे मॅडम यांनी पंचा समक्ष शासनाच्या राष्ट्रीय अनुसुचित जाती वित्त व विकास निगम योजना (NSKFDC) अंतर्गत कर्जाची फाईल पुर्ण करुन प्रादेशिक कार्यालय छत्रपती संभाजीनगर येथे मंजुरी सादर करण्यासाठी 1500/-रुपये लाच रक्कम स्विकारण्यास संमती देऊन सोमवारी जिल्हा व्यवस्थापक साहेबांना भेटण्यास सांगितल्याचे निष्पन्न झाले. त्यावरुन जिल्हा व्यवस्थापक यांची दिनांक 01.04.2024 रोजी भेट घेण्याचे ठरवुन त्याबाबत सविस्तर पंचनामा केला.

त्यावरुन दिनांक 01.04.2024 रोजी महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ जालना येथील जिल्हा व्यवस्थापक हे माझ्या कडे लाच मागतात काय याची खात्री करण्यासाठी लाचमागणी पडताळणी करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यानंतर श्री.बिडवे साहेब यांनी मला, पंचाना व सापळा पथकास सूचना देवुन पोलीस अंमलदार घायवट यांनी व्हाईस रेकॉर्डर मशीन मध्ये एक नविन मेमरी कार्ड टाकुन त्यामध्ये पूर्वीचे कोणतेही संभाषण नसल्याची खात्री करुन दिली. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर मशीन सुरु करुन त्यामध्ये माझे, दोन्ही पंचाचे व श्री.बिडवे साहेबांचे वक्तव्य घेऊन व्हाईस रेकॉर्डर एका कापडी पिशवीत टाकुन माझ्या शर्टाच्या आतुन गळयात अडकवुन दिली. त्यानंतर मी व पंच क्र.1 विधाटे असे आम्हास जिल्हा व्यवस्थापक यांना भेटण्यासाठी माझ्या ऑटो रिक्षाने रवाना होऊन समाज कल्याण कार्यालयाच्या बाहेर रोडवर ऑटो रिक्षा उभा करुन पायी चालत महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ जालना कार्यालयात गेलो. त्यावेळी वाकोडे मॅडम हया शासकिय कामासाठी बाहेर गेलेल्या असल्याचे समजले. त्यानंतर माझी, वाघ मॅडम व जिल्हा व्यवस्थापक यांचेत आपसात कामासंबंधी बरीच चर्चा झाली. त्यावेळी चर्चा दरम्यान जिल्हा व्यवस्थापक यांनी पंच क्र.1 विधाटे यांचे समक्ष मॅडमला पाचशे रुपये दे विषय संपवुन टाक असे सांगितल्याने मी व पंच क्र.1 विधाटे असे आम्ही अॅन्टी करप्शन ब्युरो जालना येथे परत आलो. तेव्हा माझे जवळील व्हाईस रेकॉर्डर श्री.बिडवे साहेबांच्या सांगणे वरुन पोलीस अंमलदार श्री.घायवट यांनी बंद केला. व्हाईस रेकॉर्डर मध्ये रेकॉर्ड झालेले संभाषण श्री.बिडवे साहेबांनी माझ्या व पंचा समक्ष ऐकले. त्यामध्ये महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ जालना येथील जिल्हा व्यवस्थापक यांनी पंचा समक्ष मॅडमला पाचशे रुपये दे विषय संपवुन टाक असे म्हणुन वाकोडे मॅडम यांना भ्रष्टाचार करण्यास प्रोत्साहन दिल्याचे निष्पन्न झाले. वाकोडे मॅडम हया शासकिय कामासाठी बाहेर गेलेल्या असल्याने दिनांक 02.04.2024 रोजी सापळा कारवाई करण्याचे ठरवुन त्याबाबत सविस्तर पंचनामा केला.

दिनांक 02.04.2024 रोजी वाकोडे मॅडम यांचे विरुध्द महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ जालना येथे सापळा लावण्याचे ठरविण्यात आले. त्यानंतर श्री.बिडवे साहेबांच्या सूचने वरुन अॅन्टी करप्शन ब्युरो जालना

कार्यालयात त्यांच्या कक्षात पोलीस अंमलदार जुंबड यांनी अंथ्रासीन पावडरची व अल्ट्राव्हायलेट लाईटच्या गुणधर्माची माहीती देवुन मला व पंचांना त्याचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. वाकोडे मॅडम यांना लाच म्हणुन देण्यासाठी माझ्या कडील पाचशे रुपये दराच्या 03 नोटा एकुण 1500/- रुपये रक्कमेला पोलीस अंमलदार जुंबड यांनी अँथ्रासीन पावडर लावली. सदरील अँथ्रासीन पावडर लावलेले नोटा माझ्या पॅन्टचे समोरील उजव्या खिशात ठेवल्या. श्री.बिडवे साहेबांनी मला व पंचाना सविस्तर सुचना देवुन वाकोडे मॅडम यांनी लाच स्विकारल्या नंतर कार्यालयाच्या बाहेर येऊन उजव्या हाताची शर्टाची बाही वर करुन इशारा करणे बाबत मला सूचना दिली. तसेच सापळा टिम मधील सर्वांना त्यांचे काम समजावुन सांगुन सूचना देण्यात आल्या. पोलीस अंमलदार जुंबड यांना सापळा पथकातुन वगळुन अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालयात थांबण्याची सुचना दिली. त्याबाबतचा सापळा पथकाने सविस्तर सापळापूर्व पंचनामा केला.

त्यानंतर श्री.बिडवे साहेबांच्या सूचने वरुन पोलीस अंमलदार श्री.घायवट यांनी व्हाईस रेकॉर्डर मशीन मध्ये एक नविन मेमरी कार्ड टाकुन त्यामध्ये पूर्वीचे कोणतेही संभाषण नसल्याची खात्री करुन दिली. त्यानंतर व्हाईस रेकॉर्डर मशीन सुरु करुन त्यामध्ये माझे, दोन्ही पंचाचे व श्री.बिडवे साहेब यांचे वक्तव्य घेऊन एका कापडी पिशवीत टाकुन माझ्या शर्टाच्या आतुन गळयात व्हाईस रेकॉर्डर मशीन अडकवण्यात आली. त्यानंतर मी व पंच क्र.1 विधाटे असे आम्ही माझ्या ऑटो रिक्षाने वाकोडे मॅडम यांना भेटण्यासाठी समाज कल्याण कार्यालय जालना येथे गेलो. माझ्या पाठीमागे श्री.बिडवे साहेब हे त्यांचे सापळा पथक व पंच क्र.2 कोलगणे यांचे सह खाजगी वाहनाने समाज कल्याण कार्यालय जालना येथे आले व एकमेकांना दिसतील अशा रितीने कार्यालयाच्या परिसरात सापळा लावून थांबले.

त्यानंतर मी व पंच क्र.1 विधाटे असे आम्ही वाकोडे मॅडम यांना भेटण्यासाठी महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ जालना कार्यालयात त्यांच्या टेबल जवळ गेलो. त्याठिकाणी आमचे कामा संबधी बरीच चर्चा झाली. तेंव्हा चर्चे दरम्यान वाकोडे मॅडम यांनी मला एका इसमांकडे हाताने ईशारा करुन दोन हजार दे तिकडे असे सांगितले. त्यावेळी मी मॅडम दीड हजार करा दोन हजार नाही असे म्हणालो असता वाकोडे मॅडम ठिक हे ठिक हे असे सांगितल्याने मी त्या इसमांसोबत बोलत बोलत कार्यालयाच्या बाहेर आलो. तेंव्हा त्या इसमांने मला ऑटो रिक्षा सतकर कॉम्पलेक्सला घेण्यास सांगितल्याने मी, पंच क्र.1 विधाटे व तो इसम असे आम्ही माझ्या ऑटो रिक्षाने सतकर कॉम्पलेक्सला गेलो. तेथुन आम्ही रिक्षा घेऊन सदर इसमाच्या घरी गेलो व तेथुन समाज कल्याण कार्यालय जालना कार्यालयाच्या आवारात आलो. समाज कल्याण कार्यालय जालना कार्यालयाच्या आवारात ऑटो रिक्षात सदर इसम मला देऊन टाक आता असे म्हणाला असता मी देऊ तुम्हाला असे म्हणालो. त्यावर सदर इसम देऊन टाक असे म्हणाल्याने मी माझ्या उजव्या हाताने पॅन्टच्या समोरील उजव्या खिश्यातुन अॅन्थ्रासिन पावडर लावलेले लाचेचे 1500/- रुपये काढुन सदर इसमा समोर धरले असता त्यांनी त्यांचे उजव्या हाताने लाचेची रक्कम घेवून त्यांच्या शर्टाच्या डाव्या खिश्यात ठेवले. त्यानंतर आमचे पैश्यासंबधी बरीच चर्चा होऊन आम्ही बोलत बोलत महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ जालना कार्यालयात गेलो. त्यानंतर मी ठरल्या प्रमाणे कार्यालयाच्या बाहेर येऊन लाचेची रक्कम स्विकारल्याचा पूर्वनियोजित इशारा केला.CCTNS मध्ये शब्द मर्यादा असल्याने उर्वरित फिर्याद या सोबत जोडुन सादर करण्यात आली आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
**(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

sidharth jabaji mane(I (Inspector)) / **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

ती वेळ अंदाजे दुपारी एक वाजेच्या सुमारास होती. त्यानंतर सापळा पथक सक्रीय होवून पंच क्रं.2 कोलगणे यांचे सह त्या ठिकाणी आले. पोलीस उपअधीक्षक श्री.बिडवे साहेब यांच्या सूचने वरुन पोलीस अंमलदार घायवट यांनी माझ्या कडील व्हाईस रेकॉर्डर मशीन ताब्यात घेऊन बंद केली. त्यानंतर श्री.बिडवे साहेबांनी पंच क्र.1 विधाटे यांना लाचेची रक्कम कोणी मागितली व कोणी स्विकारली असे विचारले असता पंच क्र.1 विधाटे यांनी तेथे हजर असलेल्या एका इसमाकडे अंगुली निर्देश करुन यांनी तक्रारदार यांच्या कडुन उजव्या हाताने लाचेची रक्कम स्विकारुन त्यांच्या शर्टाच्या समोरील डाव्या खिश्यात ठेवली आहे असे सांगितल्याने सदर इसमास पंचा समक्ष लाचेच्या रकमेसह जागेवर पकडले. त्यानंतर पोलीस उपअधीक्षक श्री.बिडवे साहेब यांनी त्यांची, पंचाची व सापळा पथकाची ओळख करुन दिली. त्यानंतर सदर इसमास यांना त्यांचे नाव गाव पत्ता विचारले असता त्यांनी त्यांचे नाव आशिष उत्तम जाधव वय 24 वर्ष व्यवसाय नोकरी कंत्राटी संगणक ऑपरेटर, महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ जालना रा.म्हाडा कॉलनी, पाचंबा देवी, नुतन वसाहत जालना असे सांगीतले. त्यानंतर श्री.बिडवे साहेब यांचे सूचने वरुन पंच क्र.2 कोलगणे यांनी आशिष जाधव यांच्या शर्टाच्या समोरील डाव्या खिश्यातुन लाचेचे 1500/- रुपये काढुन घेवुन सदर नोटांचे क्रमांक व सापळापुर्व पंचनाम्यातील नोटांचे क्रमांक एकच असल्याची खात्री केली. त्यानंतर महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ जालना कार्यालयातील हजर असलेले जिल्हा व्यवस्थापक व वाकोडे मॅडम यांना ताब्यात घेण्यात आले. त्यानंतर जिल्हा व्यवस्थापक व वाकोडे मॅडम यांना त्यांचे नाव गाव पत्ता विचारले असता जिल्हा व्यवस्थापक यांनी त्यांचे नाव सुनिल लक्ष्मण काची वय 50 वर्ष व्यवसाय नोकरी जिल्हा व्यवस्थापक महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ हिंगोली अतिरिक्त पदभार जालना वर्ग-2 रा.घर क्र.A/16, सुवर्णपार्क, पिंपळे गुरव, पिंपरी-चिंचवड, पुणे व वाकोडे मॅडम हयांनी त्यांचे नाव छाया अशोक वाकोडे वय 54 वर्ष व्यवसाय नोकरी कार्यालय सहायक अतिरिक्त सहायक लेखाधिकारी महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ जालना रा.प्लॉट नं.10, कॉग्रेस नगर चिखली रोड बुलढाणा ह.मु.आदर्श शाहु नगर, अंबड रोड जालना असे सांगितले. त्यानंतर कार्यालयात काळ्या कपडयाच्या सहायाने अंधार करुन पोलीस उपअधीक्षक श्री.बिडवे साहेब यांनी अल्ट्राव्हायलेट लाईटच्या सहायाने आशिष जाधव याचे उजवा हात, शर्टाचा खिसा व लाचेच्या नोटा चेक केल्या असता आशिष जाधव यांचे उजव्या हाताचे बोटावर, शर्टाच्या समोरील डाव्या खिश्याच्या तोंडावर व आतमध्ये तसेच लाचेच्या नोटावर ठिक ठिकाणी हिरवट रंगाची चकाकी दिसुन आली. त्यानंतर सदर 1500/-रुपये लाचेची रक्कम पंचा समक्ष जागीच लाख सिल मोहर करुन जप्त करण्यात आले. तसेच माझे हात व अंगावरील कपडे अल्ट्राव्हायलेट लाईटच्या सहायाने चेक केले असता माझे उजव्या हाताचे बोटावर व अंगातील पॅन्टच्या समोरील उजव्या बाजुच्या खिश्याच्या तोंडावर व आतमध्ये ठिक ठिकाणी हिरवट रंगाची चकाकी दिसुन आली. त्यानंतर सापळा पथकाने जिल्हा व्यवस्थापक काची, कार्यालय सहायक वाकोडे मॅडम व कंत्राटी संगणक ऑपरेटर आशिष जाधव यांना ताब्यात घेऊन ॲन्टी करप्शन ब्युरो जालना कार्यालयात आलो. ॲन्टी करप्शन ब्युरो कार्यालयात आशिष जैस्वाल यांचे अंगातील शर्ट लाख सिल मोहर करुन जप्त करण्यात आले. तसा सविस्तर सापळा पथकाने सापळा पंचनामा केला.

तरी वर नमुद तीनही आरोपी विरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात यावी ही विनंती.

मी दिलेली फिर्याद माझे सांगणे प्रमाणे संगणकावर टंकलीखीत केली असुन त्याची प्रिंट काढुन मी वाचुन पाहिली. ती माझे सांगणे प्रमाणे बरोबर व खरी आहे.

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

**(4) Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.) Dinesh

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):
Dinesh

**15.Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

Zoisprte

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)
पोलीस ठाणे अमलदार कदिम जालना

**Name** (नाव): Sidharth jabaji mane
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):